भारतीय महाविद्यालय, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

**(2014-15)**

प्रा. निलेश कडू
कार्यक्रम अधिकारी
प्रा. आम्रपाली वासनिक
महिला कार्यक्रम अधिकारी

# नियमित कार्यक्रम अहवाल

इ. स. 1969 साली महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या विचारांची प्रेरणा केंद्रस्थानी ठेऊन युवकांना समाज व देशकार्यात सहभागी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली. राष्ट्रनिर्माणाची जाणीव विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यात व्हावी व त्यांनी आपल्या कल्पकतेने राष्ट्र उभारणीसाठी हातभार लावावा या हेतूने राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना प्रेरणा देणारी एक चळवळ आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालय अंतर्गत राबविण्यात येते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाला 200 (100 मुले + 100 मुली) विद्यार्थ्यांची मान्यता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या **'Not Me, But You'** या ब्रिदवाक्यानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे कार्य आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत नियामित कार्यक्रमाच्या व विशेष शिबिराच्या माध्यमातून सतत सुरु आहे.

महाविद्यालयात 2014-15 या शैक्षणिक सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पुढील नियामित कार्यक्रम राबविण्यात आले. त्या सत्रातील नोंदी पुढीलप्रमाणे आहे.

1. सायबर क्राईम, बॉम्ब शोधक व नाशक आणि वाहतुक नियम व कायदा: -

27 जुलै 2014 रोजी पोलीस आयुक्तालय, अमरावती यांच्या सहकार्याने 'सायबर क्राईम, बॉम्ब शोधक व नाशक आणि वाहतुक नियम व कायदा' या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर भारतीय विद्यामंदिराच्या सरचिटणीस डॉ. आराधना वैद्य यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. या. कार्यक्रमासाठी श्री. प्रदिप परदेशी (पोलीस निरीक्षक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, अमरावती शहर) तसेच श्री. ए. एस. सोनोने (सहाय्यक पोलीस निरीक्षक, शहर वाहतुक शाखा अमरावती), श्री. रवी राठोड (सहाय्यक पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम अमरावती) प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले. तसेच श्री. साळवी (पोलीस निरीक्षक, राजापेठ पोलीस स्टेशन अमरावती) हे सुध्दा कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन नरेंद्र वारे तर प्रास्ताविक प्रा. पंडीत काळे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. पुजा कातोरे हिने केले.

2. स्वच्छता व आरोग्य अभियान: -

03 ऑगस्ट 2014 रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छता व आरोग्य जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमांतर्गत संपूर्ण परिसरातील स्वच्छता करण्यात आली. या सत्रात दमदार पावसामुळे गवत, साचलेले पाण्याचे डबके, गांजर गवत, अस्थाव्यस्थ झाडांच्या फांद्या यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर आढळत होती म्हणूनच स्वयंसेवकांनी ही मोहीम हाती घेतली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी स्वयंसेवकांशी हितगुज केली व झालेल्या स्वच्छतेची पाहणी केली.

3. वृक्षवाटप व वृक्षसंवर्धन: -

06 ऑगस्ट 2014 रोजी रोटरी क्लब, अमरावती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने ‘वृक्षवाटप व वृक्षसंवर्धन’ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. एक झाड, एक विद्यार्थी या संकल्पनेतून या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर भारतीय विद्यामंदिराच्या सरचिटणीस डॉ. आराधना वैद्य यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. तसेच रोटरी क्लब, अमरावती च्या अध्यक्षा प्रा. डॉ. मंगला भाटे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभल्या. कार्यक्रमाला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते. वृक्षसंवर्धनाची गरज आणि महत्व विशद करुन मान्यवरांच्या हस्ते 200 विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन निलेश करंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. आरती धनुष्कर हिने केले.

4. क्रांतिदिन: -

09 ऑगस्ट 2014 रोजी क्रांतिदिनाचे औचित्य साधून, माजी. स्वातंत्र सेनानी मा. श्री. माणिकरावजी मोरे यांचा सत्कार समारंभ राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी भुषविले तर प्रमुख अतिथी म्हणून भारतीय विद्यामंदिराचे माजी सरचिटणीस मा. श्री. आर. के. बिजवे व महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा. श्री. जी. एच. शाह उपस्थित होते. मान्यवरांनी क्रांतिदिनाच्या ऐतिहासिक क्षणांचा थोडक्यात आढावा दिला व 1942 च्या क्रांतिचे स्मरण करुन दिले. कार्यक्रमाला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.

पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हर्षा गावंडे तर प्रास्ताविक प्रा. पंडीत काळे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. कोमल खोब्रागडे हिने मानले.

## 5. पथनाट्यातून जनजागृती व वाहतुक नियंत्रण जनजागृती: -

15 ऑगस्ट 2014 रोजी स्वातंत्र दिनाच्या पर्वावर ध्वजारोहण नंतर राष्ट्रीय सेवा योजना तर्फे 'वाहतुक नियंत्रण व महिला अत्याचार जनजागृती' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर भारतीय विद्यामंदिराचे कोषाध्यक्ष डॉ. सतिष कुळकर्णी व रा. से. यो. सल्लागार समिती सदस्य डॉ. सुभाष गवई यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. विद्यार्थ्यांनमध्ये व जनतेमध्ये वाहतुक संबंधी जनजागृती निर्माण व्हावी या दृष्टीकोणातून 'वाहतुक नियंत्रण जनजागृती' फलकाचे अनावरण व पत्रकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच रा. से. यो. स्वयंसेवकांनी 'महिला अत्याचार जनजागृती' संदर्भात पथनाट्याचे सादरीकरण महाविद्यालयात व राजापेठ चौकात केले व त्यानंतर 'वाहतुक नियंत्रण जनजागृती' पत्रक वाहन चालकांना व पदचा-यांना वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैभव धर्माळे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. प्रिया गुल्हाने हिने मानले. या कार्यक्रमासाठी रा. से. यो. स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## 6. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन (दत्तक ग्राम निंभोरा): -

28 ऑगस्ट 2014 रोजी दत्तक ग्राम निंभोरा ता. भातकुली येथे 'वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू ,

सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, गावातील पोलीस पाटील श्री. सुभाषराव यादगिरे व प्रतिष्ठीत नागरिक श्री. रावसाहेब यादगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली रा. से. यो. स्वयंसेवकांनी गावातील रस्त्याच्या आजुबाजूला, शाळेसमोर व घरासमोरील खुल्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले व वृक्ष संवर्धनाचे महत्व लोकांना पटवून दिले. वृक्षारोपणामध्ये कडूनिंब, वड व पिंपळ या झाडांचा वापर करण्यात आला. या सर्व अभियानामध्ये गावातील मुलांचा तसेच गावक-यांचा उत्कृष्ठ सहभाग लाभला व त्यांच्या सहकार्याने वृक्षारोपण करण्यास मदत लाभली.

## 7. राष्ट्रीय सेवा योजना सप्ताह

### i) राष्ट्रीय पूर्ननिर्माणमध्ये युवकांची भुमिका: -

25 सप्टेंबर 2014 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्याने “राष्ट्रीय पूर्ननिर्माणमध्ये युवकांची भुमिका” या विषयावर प्रा. स्वप्नील पोतदार (भौतिकशास्त्र विभाग, सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती) यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. विनोद कल्यमवार व प्रा. विद्या पाथरकर उपस्थित होते.

### ii) स्टॉक मार्केटींग: -

26 सप्टेंबर 2014 रोजी रा. से. यो. सप्ताहाच्या निमित्याने “स्टॉक मार्केटींग” या विषयावर श्री. कुंतल बाखडे (मॅनेजिंग डायरेक्टर, अनुदर्शन ॲडव्हाझरी आणि स्टॉक ब्रोकिंग कंपनी, अमरावती) यांचे मार्गदर्शन आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला रा. से. यो. कार्यक्रम

अधिकारी प्रा. निलेश कडू, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे, डॉ. अनिल खांडेकर व प्रा. नितीन तट्टे उपस्थित होते.

### iii) आहार व पोषण: -

27 सप्टेंबर 2014 रोजी रा. से. यो. सप्ताहाच्या निमित्याने "आहार व पोषण" या विषयावर डॉ. अंजली देशमुख (विभाग प्रमुख, गृहविज्ञान विभाग, शासकिय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती) यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला भारतीय विद्यामंदिराच्या सरचिटणीस डॉ. आराधना वैद्य, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे, डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी, डॉ. अलका गायकवाड, उपस्थित होते.

### iv) रक्तगट चाचणी शिबिर (दत्तक ग्राम निंभोरा): -

27 सप्टेंबर 2014 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्याने दत्तक ग्राम निंभोरा येथे गावक-यांसाठी रक्तगट चाचणी शिबीर आयोजन करण्यात आले. शिबीराचे आयोजन श्री. रावसाहेब यादगिरे यांच्या घरी करण्यात आले. रक्तगट चाचणीसाठी क्लिनिकल लेबॉरेटरी टेक्नॉलोजी विषयाच्या डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी व त्यांची चमू यांचे सहकार्य लाभले. या शिबीरात एकून 100 गावकरी व गावातील विद्यार्थींची रक्तगट चाचणी करण्यात आली. या शिबीराला सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे, डॉ. अनिल खांडेकर व प्रा. नितीन तट्टे उपस्थित होते.

## v) जागतिक वन्यजिव संरक्षण सप्ताह निमित्य रॅली: -

01 ऑक्टोबर 2014 रोजी रा. से. यो. सप्ताहाच्या निमित्याने "जागतिक वन्यजिव संरक्षण सप्ताह" निमित्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीचा मार्ग महाविद्यालय पासून राजापेठ चौक, बिच्छू टेकडी, मुदळकर पेठ, जनार्धन पेठ पर्यंत होता. रॅलीच्या आयोजनामध्ये डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी, डॉ. अनिल खांडेकर व प्रा. नितीन तट्टे यांचे सहकार्य लाभले.

## vi) स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन: -

01 ऑक्टोबर 2014 रोजी रा. से. यो. सप्ताहाच्या निमित्याने, रा. से. यो. व स्पर्धा परिक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी भुषविले तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्रीनिवास ओमनवार (सं. गा. बा. विद्यापीठ,अमरावती) व प्रा. वैभव मस्के ( ॲमबिशन अकादमी, अमरावती) लाभले. कार्यक्रमादरम्यान प्रमुख वक्त्यांचा सत्कार घेण्यात आला. कार्यक्रमाला रा. से. यो. चे सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हर्षा गावंडे तर प्रास्ताविक प्रा. पंडीत काळे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. प्रिया गुल्हाने हिने मानले.

## vii) "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत महाविद्यालयीन स्वच्छता: -

02 ऑक्टोबर 2014 रोजी "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत महाविद्यालयामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमामध्ये 'एक कदम स्वच्छता की ओर' अशी शपथ घेण्यात आली. प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी व सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर

कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांनी शपथ घेतली. या दिवशी विद्यार्थांनसोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी हाती झाडू, विळा व टोपले घेवून महाविद्यालय परिसर व सर्व वर्ग खोल्या स्वच्छ केल्या. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक, सह कार्यक्रम अधिकारी प्रा. पंडित काळे, प्रा. गायत्री चवाळे व रा. से. यो. स्वयंसेवक यांनी केले.

### viii) महात्मा गांधी जयंती: -

02 ऑक्टोबर 2014 रोजी 'म. गांधी जयंती' व रा. से. यो. सप्ताह समारोप निमित्य "म. गांधीजींचे विचार" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाला वक्त्या म्हणून लाभलेल्या मा. प्रा. बबीताताई येवले, क्षेत्रीय समन्वयक, रा. से. यो., संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी म. गांधी यांच्या जीवनावर व कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते. या कार्यक्रमाला भारतीय विद्यामंदीराच्या सरचिटणीस डॉ. आराधनाताई व भारतीय विद्यामंदीराचे कोषाध्यक्ष डॉ. सतिश कुळकर्णी यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. तसेच या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. प्रिया गुल्हाने हिने केले तर आभार कु. कांचन कळसकर हिने मानले.

### 8. सरदार वल्लभभाई पटेल जयंती: -

31 ऑक्टोबर 2014 रोजी सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी भुषविले. या कार्यक्रमाला भारतीय विद्यामंदीराच्या सरचिटणीस डॉ. आराधनाताई व भारतीय विद्यामंदीराचे उपाध्यक्ष श्री. रमेश बिजवे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. तसेच या कार्यक्रमाला

महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. गावंडे यांनी केले तर आभार गणेश बडगरे यांनी मानले.

## 9. रक्तदान शिबिर: -

05 डिसेंबर 2014 रोजी राष्ट्रीय सेवा योजना व एच. डी. एफ. सी. बँक, अमरावती तर्फे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीराचे उद् घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी केले. यावेळी भारतीय विद्यामंदीराच्या सन्माननीय सरचिटनीस डॉ. आराधना वैद्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रा. से. यो. सल्लागार समिती सदस्य डॉ. सुभाष गवई, एच. डी. एफ. सी. बँक चे श्री. पंकज भैया व श्री.मयुर वस्ताणी उपस्थीत होते. रक्तदान शिबीरास संत गाडगे बाबा ब्लड बँक, अमरावतीचे डॉ. जोशी व त्यांचे चमू यांचे सहकार्य लाभले. या शिबिरामध्ये एकूण 107 महविद्यालयीन विद्यार्थींनी रक्तदानाचा हक्क बजावला. रक्तदान शिबीराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, प्रा. आम्रपाली वासनिक, प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी केले.

## 10.“स्वच्छ भारत अभियान” अंतर्गत दत्तक ग्राम निंभोरा येथे स्वच्छता व वृक्षारोपण:

07 डिसेंबर 2014 रोजी “स्वच्छ भारत अभियान” अंतर्गत दत्तक ग्राम निंभोरा ता. भातकुली येथे ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, गावातील पोलीस पाटील श्री. सुभाषराव यादगिरे व प्रतिष्ठीत नागरिक श्री. रावसाहेब यादगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली रा. से. यो. स्वयंसेवकांनी ग्राम स्वच्छता केली. गावातील गाळाने तुडूंब भरलेल्या सांडपाण्याच्या नाल्या स्वयंसेवकांनी साफ केल्या तसेच

घराबाहेरील सांडपाण्याचे सोचखड्डे साफ करुन व आजुबाजूचे गवत काढून घरासमोरील परिसर स्वच्छ केला व घरातील पुरुषांना व महिलांना स्वच्छतेचे व आरोग्याचे महत्व पटवून दिले. त्याचप्रमाणे गावातील तरुण मुलांच्या सहकार्याने रस्त्याच्या आजुबाजूचे गवत काढून सर्व रस्ते झाडूने झाडून स्वच्छ केले. त्याच दिवशी गावात रस्त्याच्या आजुबाजूला व घरासमोरील खुल्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले व वृक्ष संवर्धनाचे महत्व लोकांना पटवून दिले. वृक्षारोपणामध्ये कडूनिंब, कडूबदाम, वड व पिंपळ या झाडांचा वापर करण्यात आला. या सर्व अभियानामध्ये गावातील मुलांचा तसेच गावक-यांचा उत्कृष्ठ सहभाग लाभला व त्यांच्या सहकार्याने ग्राम स्वच्छता करण्यास मदत लाभली.

## 11. नागरीकांचे आधारभूत कर्तव्य: -

16 डिसेंबर 2014 रोजी राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती तर्फे "नागरिकांचे आधारभूत कर्तव्य" या विषयावर कायदेविषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचे अध्यक्ष मा. ॲड. यदुराजजी मेटकर (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदीर अमरावती) होते तर प्रमुख वक्ते मा. श्री. एल. एस. पाढेन (तिसरे, सह दिवाणी न्यायाधीश, अमरावती) म्हणून लाभले. तसेच भारतीय विद्यामंदीराच्या सरचिटनीस डॉ. आराधना वैद्य व भारतीय विद्यामंदीराचे उपाध्यक्ष श्री. आर. बी. बिजवे उपस्थीत होते. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. अलका गायकवाड व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीचे श्री. अजय कडू उपस्थीत होते. या शिबीराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक, सह कार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, महिला सह कार्यक्रम अधिकारी प्रा. गायत्री चवाळे व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी केले. या कार्यक्रमाचे संचालन कु. रश्मी जिवतोडे हीने केले. तर प्रास्ताविक

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीचे श्री. अजय कडू यांनी केले व आभार प्रदर्शन कु. प्रिया गुल्हाने हीने केले.

## 12. अल्पसंख्यांक हक्क दिवस: -

18 डिसेंबर 2014 रोजी अल्पसंख्यांक हक्क दिन निमित्य अल्पसंख्यांकाच्या "घटनात्मक आणि कायदेशिर हक्क" या विषयावर कायदेविषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य, मा. डॉ. ए. जे. गादेवार होते तर प्रमुख वक्ते मा. ॲड. नयीम अहमद व ॲड. पुंच्छी म्हणून लाभले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक, सह कार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, महिला सह कार्यक्रम अधिकारी प्रा. गायत्री चवाळे व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी केले. या कार्यक्रमाचे संचालन कु. रश्मी जिवतोडे हीने केले व आभार प्रदर्शन कु. प्रिया गुल्हाने हीने केले.

डॉ. ए. जे. गादेवार
प्राचार्य

प्रा. निलेश कडू
कार्यक्रम अधिकारी

डॉ. आम्रपाली वासनिक
महिला कार्यक्रम अधिकारी

प्रा. पंडीत काळे
सहकार्यक्रम अधिकारी

प्रा. गायत्री चवाळे
सहमहिला कार्यक्रम अधिकारी